# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना** :- विकास योजना नागपूर (सुधारीत)

**{ नगर रचना विभाग }** मौजा - बोरगांव, खसरा क्र. 157/6 पैकी, 158 पैकी, 163 पैकी च्या जागेवरील आरक्षण क्र. MNW-27 माध्यमिक शाळेकरीता राखीव 1.228 हेक्टर क्षेत्रापैकी 3258.16 चौ.मी. क्षेत्राची जागा EWS सदनिकांचा प्रकल्प राबविण्यास्तव उक्त जागा सार्वजनिक गृहनिर्माण (Public Housing) करीता आरक्षित करणेस्तव महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदल करणेबाबत.

नागपूर शहराची सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 (1) अन्वये शासन, अधिसूचना नगर विकास विभाग क्र. टिपीएस-2496-2643- प्र.क्र. 300 (अ)-97 नवी-9, दि. 07 जानेवारी 2000 अन्वये मंजुर झाली असून ती दि. 01 मार्च 2000 पासून अंमलात आली आहे तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस-2400-1628-सी.आर.-200-नवि-9, दि. 10.09.2001 अन्वये मंजुर झाली असून ती दि. 21.09.2001 पासून अमंलात आलेली आहे. तसेच शासनाचे नगर विकास विभागाचे अधिसूचना क्र. टिपीएस-2401-885-प्र.क्र.-76/नवि-9, दि. 27.02.2002 अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या क्षेत्रांअंतर्गत सात योजनांचे क्षेत्र वगळून उर्वरीत नागपूर शहराकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे. तथापी शासनाकडील नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-2419-1419- प्र.क्र. 154/2019-नवि-9, दि.27.08.2019 अन्वये संपुर्ण क्षेत्राकरीता नागपूर महानगरपालिका नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले होते. तद्नंतर शासनाकडील शासन निर्णय क्र. टिपीएस-2419/ प्र.क्र.-154 (भाग-1)/2019-नवि-9, दि 09.04.2021 अन्वये 7 योजनेतील स्मार्ट सिटी अंतर्गत नगर रचना योजनेतील क्षेत्र वगळून पुन्हा त्या क्षेत्राकरीता नागपूर सुधार प्रन्यासला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे.

नागपूर शहराच्या मंजूर विकास योजना सुधारीत मध्ये मौजा-बोरगांव येथील खसरा क्र. 157/6 पैकी, 158 पैकी व 163 पैकी मधील 1.228 हेक्टर क्षेत्राची जागा MNW-27 माध्यमिक शाळेकरीता राखीव असून, उक्त आरक्षणाचे समुचित प्राधिकरण नागपूर महानगरपालिका / खाजगी संस्था म्हणून आहे. सदर आरक्षणाच्या जागेकरीता नागपूर महानगरपालिका नियोजन प्राधिकरण आहे.

नागपूर महानगरपालिकेने आरक्षण क्र. MNW-27 माध्यमिक शाळेच्या राखीव जागेच्या अनुषंगाने 6294.453 चौ.मी. क्षेत्राची जागा ताब्यात घेतलेली असून, त्याबाबतची नोंद आखिव पत्रिकेत आहे. तसेच मंजूर अभिन्यास नकाशानूसार माध्यमिक शाळेकरीता 6361.00 चौ.मी. एवढे क्षेत्र नमूद आहे. नागपूर महानगरपालिकेने ताब्यात घेतलेल्या जागेच्या आकारमानानूसार राखीव जागेच्या स्थानमानात बदल करणेची कार्यवाही करणे आवश्यक होते, तथापि तशी कार्यवाही यापूर्वी करण्यात आलेली नाही. त्यामुळे नागपूर महानगरपालिकेच्या ताब्यातील 6294.453 चौ.मी. क्षेत्रापैकी जे क्षेत्र आरक्षण क्र. MNW-27 माध्यमिक शाळेसाठी राखीव आहे, त्यापैकी सुमारे

3258.16 चौ.मी. क्षेत्राची जागा मंजूर विकास योजनेत दर्शविलेल्या आरक्षणाच्या हद्दीनूसार असून, उर्वरीत क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ठ आहे. त्यामुळे उक्त आरक्षित माध्यमिक शाळेच्या जागेच्या नामाभिधानामध्ये फेरबदल करावयाचे झाल्यास आरक्षण क्र. MNW-27 माध्यमिक शाळेच्या राखीव जागेपैकी 3258.16 चौ.मी. क्षेत्राच्या जागेत फेरबदल करणे आवश्यक आहे. त्याबाबत विकास योजनेच्या भाग नकाशात सदर क्षेत्र दर्शवून भाग नकाशा सोबत सादर केलेला आहे. तसेच या भागात माध्यमिक शाळेकरीता जागेची आवश्यकता नसून, माध्यमिक शाळेचा प्रस्ताव नसल्याचे शिक्षणाधिकारी, महानगरपालिका, नागपूर यांनी कळविलेले आहे.

कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री आवास योजनेमार्फत उक्त जागेवर प्रधानमंत्री आवास योजना (PMAY) विकसीत करावयाचे असल्याचे कळविले आहे. त्यामुळे आरक्षण क्र. MNW-27 माध्यमिक शाळेकरीता राखीव 1.228 हेक्टर जागेपैकी 3258.16 चौ.मी. क्षेत्राची जागा नागपूर महानगरपालिकेच्या ताब्यात असल्याने व सदर जागेस मंजूर अभिन्यासातील 12.00 मी. रूंदीचा रस्ता पोच म्हणून असल्याने सदर आरक्षण क्र. MNW-27 माध्यमिक शाळेचे आरक्षित जागेपैकी 3258.16 चौ.मी. जागेचे नामाभिधान बदलून " Public Housing " (सार्वजनिक गृहनिर्माण) असे करणेकरीता सुधारीत मंजूर विकास योजनेमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम-37 अन्वये फेरबदल प्रस्ताव कार्यान्वित करणे आवश्यक आहे.

उक्त प्रस्तावित फेरबदल प्रस्तावानूसार नागपूर शहराच्या सुधारीत मंजूर विकास योजनेतील मौजा- बोरगांव, खसरा क्र. 157/6 पैकी, 158 पैकी व 163 मधील आरक्षण क्र. MNW-27 माध्यमिक शाळेचे राखीव क्षेत्र 1.228 हेक्टर जागेपैकी नागपूर महानगरपालिकेच्या ताब्यात असलेली 3258.16 चौ.मी. क्षेत्राची जागा विकास योजनेच्या भाग नकाशात दर्शविल्यानूसार आरक्षण क्र. MNW-27 माध्यमिक शाळेचे नामाभिधान बदलवून "Public Housing" (सार्वजनिक गृहनिर्माण) करीता राखीव ठेवणे व त्याकरीता नागपूर महानगरपालिका समुचित प्राधिकरण म्हणून करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव प्रस्तावित आहे.

याकरीता प्रशासकीय ठराव पारीत करून सदर फेरबदल प्रस्तावाबाबत संपूर्ण वैधानिक कार्यवाही केल्यांनतर सदर प्रस्ताव शासन मान्यतेकरीता सादर करणे आवश्यक आहे. याकरीता सदर फेरबदलाची सूचना शासन राजपत्रात, दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे त्यावर प्राप्त आक्षेप/ हरकतीवर सुनावणी देऊन योग्य निर्णय घेऊन व तदनंतर उक्त प्रस्ताव शासनास मंजूरीस्तव सादर करण्याकरीता मा. आयुक्त महानगरपालिका, नागपूर यांना अधिकार प्रदान करण्याबाबत मंजूरी देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

(सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.)

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- 71/मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 20/11/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२

अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपसंचालक, नगर रचना विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार विकास योजना नागपूर (सुधारीत) मौजा - बोरगांव, खसरा क्र. 157/6 पैकी, 158 पैकी, 163 पैकी च्या जागेवरील आरक्षण क्र. MNW-27 माध्यमिक शाळेकरीता राखीव 1.228 हेक्टर क्षेत्रापैकी 3258.16 चौ.मी. क्षेत्राची जागा EWS सदनिकांचा प्रकल्प राबविण्यास्तव उक्त जागा सार्वजनिक गृहनिर्माण (Public Housing) करीता आरक्षित करणेस्तव महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदल करणेबाबत.

नागपूर शहराची सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 (1) अन्वये शासन, अधिसूचना नगर विकास विभाग क्र. टिपीएस-2496-2643- प्र.क्र. 300 (अ)-97 नवी-9, दि. 07 जानेवारी 2000 अन्वये मंजुर झाली असून ती दि. 01 मार्च 2000 पासून अंमलात आली आहे तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस-2400-1628-सी.आर.-200-नवि-9, दि. 10.09.2001 अन्वये मंजुर झाली असून ती दि. 21.09.2001 पासून अमंलात आलेली आहे. तसेच शासनाचे नगर विकास विभागाचे अधिसूचना क्र. टिपीएस-2401-885-प्र.क्र.-76/नवि-9, दि. 27.02.2002 अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या क्षेत्रांअंतर्गत सात योजनांचे क्षेत्र वगळून उर्वरीत नागपूर शहराकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे. तथापी शासनाकडील नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-2419-1419- प्र.क्र. 154/2019-नवि-9, दि.27.08.2019 अन्वये संपुर्ण क्षेत्राकरीता नागपूर महानगरपालिका नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले होते. तद्नंतर शासनाकडील शासन निर्णय क्र. टिपीएस-2419/ प्र.क्र.-154 (भाग-1)/2019-नवि-9, दि 09.04.2021 अन्वये 7 योजनेतील स्मार्ट सिटी अंतर्गत नगर रचना योजनेतील क्षेत्र वगळून पुन्हा त्या क्षेत्राकरीता नागपूर सुधार प्रन्यासला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे.

नागपूर शहराच्या मंजूर विकास योजना सुधारीत मध्ये मौजा-बोरगांव येथील खसरा क्र. 157/6 पैकी, 158 पैकी व 163 पैकी मधील 1.228 हेक्टर क्षेत्राची जागा MNW-27 माध्यमिक शाळेकरीता राखीव असून, उक्त आरक्षणाचे समुचित प्राधिकरण नागपूर महानगरपालिका / खाजगी संस्था म्हणून आहे. सदर आरक्षणाच्या जागेकरीता नागपूर महानगरपालिका नियोजन प्राधिकरण आहे.

नागपूर महानगरपालिकेने आरक्षण क्र. MNW-27 माध्यमिक शाळेच्या राखीव जागेच्या अनुषंगाने 6294.453 चौ.मी. क्षेत्राची जागा ताब्यात घेतलेली असून, त्याबाबतची नोंद आखिव पत्रिकेत आहे. तसेच मंजूर अभिन्यास नकाशानूसार माध्यमिक शाळेकरीता 6361.00 चौ.मी. एवढे क्षेत्र नमूद आहे. नागपूर महानगरपालिकेने ताब्यात घेतलेल्या जागेच्या आकारमानानूसार राखीव जागेच्या स्थानमानात बदल करणेची कार्यवाही करणे आवश्यक होते, तथापि तशी कार्यवाही यापूर्वी करण्यात आलेली नाही. त्यामुळे नागपूर महानगरपालिकेच्या ताब्यातील 6294.453 चौ.मी. क्षेत्रापैकी जे क्षेत्र आरक्षण क्र. MNW-27 माध्यमिक शाळेसाठी राखीव आहे, त्यापैकी सुमारे 3258.16 चौ.मी. क्षेत्राची जागा मंजूर विकास योजनेत दर्शविलेल्या आरक्षणाच्या हद्दीनूसार असून, उर्वरीत क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ठ आहे. त्यामुळे उक्त आरक्षित माध्यमिक शाळेच्या जागेच्या

नामाभिधानामध्ये फेरबदल करावयाचे झाल्यास आरक्षण क्र. MNW-27 माध्यमिक शाळेच्या राखीव जागेपैकी 3258.16 चौ.मी. क्षेत्राच्या जागेत फेरबदल करणे आवश्यक आहे. त्याबाबत विकास योजनेच्या भाग नकाशात सदर क्षेत्र दर्शवून भाग नकाशा सोबत सादर केलेला आहे. तसेच या भागात माध्यमिक शाळेकरीता जागेची आवश्यकता नसून, माध्यमिक शाळेचा प्रस्ताव नसल्याचे शिक्षणाधिकारी, महानगरपालिका, नागपूर यांनी कळविलेले आहे.

कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री आवास योजनेमार्फत उक्त जागेवर प्रधानमंत्री आवास योजना (PMAY) विकसीत करावयाचे असल्याचे कळविले आहे. त्यामुळे आरक्षण क्र. MNW-27 माध्यमिक शाळेकरीता राखीव 1.228 हेक्टर जागेपैकी 3258.16 चौ.मी. क्षेत्राची जागा नागपूर महानगरपालिकेच्या ताब्यात असल्याने व सदर जागेस मंजूर अभिन्यासातील 12.00 मी. रूंदीचा रस्ता पोच म्हणून असल्याने सदर आरक्षण क्र. MNW-27 माध्यमिक शाळेचे आरक्षित जागेपैकी 3258.16 चौ.मी. जागेचे नामाभिधान बदलून " Public Housing " (सार्वजनिक गृहनिर्माण) असे करणेकरीता सुधारीत मंजूर विकास योजनेमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम-37 अन्वये फेरबदल प्रस्ताव कार्यान्वित करणे आवश्यक आहे.

उक्त प्रस्तावित फेरबदल प्रस्तावानूसार नागपूर शहराच्या सुधारीत मंजूर विकास योजनेतील मौजा- बोरगांव, खसरा क्र. 157/6 पैकी, 158 पैकी व 163 मधील आरक्षण क्र. MNW-27 माध्यमिक शाळेचे राखीव क्षेत्र 1.228 हेक्टर जागेपैकी नागपूर महानगरपालिकेच्या ताब्यात असलेली 3258.16 चौ.मी. क्षेत्राची जागा विकास योजनेच्या भाग नकाशात दर्शविल्यानूसार आरक्षण क्र. MNW-27 माध्यमिक शाळेचे नामाभिधान बदलवून "Public Housing" (सार्वजनिक गृहनिर्माण) करीता राखीव ठेवणे व त्याकरीता नागपूर महानगरपालिका समुचित प्राधिकरण म्हणून करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव प्रस्तावित आहे.

याकरीता प्रशासकीय ठराव पारीत करून सदर फेरबदल प्रस्तावाबाबत संपूर्ण वैधानिक कार्यवाही केल्यांनतर सदर प्रस्ताव शासन मान्यतेकरीता सादर करणे आवश्यक आहे. याकरीता सदर फेरबदलाची सूचना शासन राजपत्रात, दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे त्यावर प्राप्त आक्षेप/ हरकतीवर सुनावणी देऊन योग्य निर्णय घेऊन व तदनंतर उक्त प्रस्ताव शासनास मंजूरीस्तव सादर करण्याकरीता मा. आयुक्त महानगरपालिका, नागपूर यांना अधिकार प्रदान करण्याबाबत मंजूरी देण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मान्यता प्रदान केली.